# इये वेदांताचिये नगरी

**श्री. चंद्रशेखर मुद्गल**

## दीपावली

दिनांक १४ ऑक्टोबर २००९ रोजी वसुबारसाने दीपावलीला सुरुवात झाली. तपोवनात सवत्स धेनूंची पूजा करण्यात आली. गाय-वासराला सजवून त्यांना गोग्रास देण्यात आला. वसुबारसापासूनच देवस्थानात पणत्या लावण्यात आल्या.

१५ ऑक्टोबर २००९ रोजी गुरुद्वादशी व धनत्रयोदशी होती. तेव्हापासून भाविकांची देवस्थानात दर्शनाला गर्दी वाढली. १७ ऑक्टोबर २००९ रोजी लक्ष्मीपूजनाच्या वेळी सायंकाळी लक्ष्मीपूजन व स्तवन झाल्यावर आरतीनंतर फटाके व आतषबाजी करण्यात आली.

## वैकुंठ चतुर्दशी

हरिहरांची भेट झाली तो दिवस म्हणजेच 'वैकुंठ चतुर्दशी' कार्तिक शुद्ध चतुर्दशी हा दिवस आपल्या देवस्थानात वैकुंठ चतुर्दशी म्हणून साजरा केला जातो. ही हरिहरांची भेट आवळीच्या वृक्षाखाली झाली म्हणून या दिवशी आवळी पूजनाचे विशेष महत्त्व आहे. रविवार दिनांक १ नोव्हेंबर २००९ रोजी सायंकाळी तपोवनात आवळी पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या दिवसाचे औचित्य साधून वेदांत विद्यापीठातील विद्यार्थ्यांची देवस्थान ते तपोवन अशी धार्मिक सहल आयोजित केली होती. विद्यार्थ्यांनी व अध्यापक गुरुजींनी पूजेत सहभागी होऊन वेदपठण केले. उपस्थित भक्तांनी विष्णुसहस्रनाम व शिवमहिम्न स्तोत्राचे पठण केले. आवळीच्या वृक्षावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच सभोवतालचा परिसर सारवून फुलांची सजावट करून सुशोभित केला होता. कार्यक्रमाचे आयोजन व्यवस्थापनाच्या सहकार्याने नगर महिला सत्संग मंडळाने उत्तम प्रकारे केले.

## त्रिपुरारी पौर्णिमा

दिनांक २ नोव्हेंबर २००९ रोजी त्रिपुरारी पौर्णिमेला देवस्थानात 'दीपोत्सव' साजरा करण्यात आला. भगवान शंकरांनी या दिवशी त्रिपुर दैत्याचा वध करून देवांचे दैन्य दूर केले म्हणून दीपोत्सव केला जातो. दीपोत्सवाच्या ४ ते ५ दिवस आधी नगर महिला सत्संगाच्या कार्यकर्त्यांची तयारी चालू होती. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी सकाळी औरंगाबाद सत्संग मंडळातर्फे सद्गुरु चरणांची पाद्यपूजा करण्यात आली. दुपारपासूनच रांगोळ्या काढणे, सजावट करणे, पणत्या भरणे, त्या वेगवेगळ्या जागांवर ठेवणे यासाठी महिला कार्यकर्त्यांची लगबग चालू होती. प. पू. गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणे सायंकाळच्या आरतीच्या वेळी कानडी आरती सुरू होताच दीप प्रज्वलनास सुरुवात झाली. प्रथम गर्भगृहासमोरील व अधिष्ठानातील चांदीच्या पणत्या विश्वस्तांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आल्या आणि त्यानंतर हजारो दीप तेजोमय झाले. ११,००० पणत्यांच्या तेजाने श्रीदत्तक्षेत्र उजळून निघाले.

श्री दत्तात्रेय मंदिराची तीनही शिखरे विद्युत रोषणाईने सजली होती. श्री दत्तक्षेत्राचा संपूर्ण परिसर, कल्पवृक्ष, लक्ष्मीमंडप, वेदांत, श्री दत्तात्रेय निवास या सर्व ठिकाणी पणत्या लावण्यात आल्या होत्या. श्री दत्तक्षेत्रातील परिसरामध्ये (मैदानात) स्वस्तिक, ओम, कुंभ, श्री, त्रिशूल, कल्पवृक्ष इत्यादी शुभ आकृत्यांसह लावलेल्या दीपज्योतींचे दर्शन अतिशय विलोभनीय होते.

आरतीनंतर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. रंगीत तोफा, मयूर खांब, धबधबा, ॐकार, आकाशबाण अशा प्रकारच्या विविधढंगी फटाक्यांचे दारूकाम करण्यात आले. काही काळ इलेक्ट्रिकचे बाहेरील दिवे मालवून टाकण्यात आले होते. फक्त दीपज्योतींनी उजळून निघालेला दत्तक्षेत्र परिसर पाहून मन प्रसन्न होत होते. अकरा हजार दीपांचा मंद प्रकाश, प्रकाशासह जाणवणारा सुवास, चंद्राचा शीतल प्रकाश, मंद वाहणारा गार वारा आणि कणाकणात भरून राहिलेलं सद्गुरूंचं अस्तित्व! अशा आल्हाददायक वातावरणाने प्रत्येक उपस्थित भक्त भारावून गेला होता.

**भागवत सप्ताह**

प. पू. गुरुदेवांनी घालून दिलेल्या प्रथेप्रमाणे देवस्थानात दरवर्षी भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी दिनांक १८ नोव्हेंबर २००९ ते २६ नोव्हेंबर २००९ पर्यंत म्हणजेच मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया ते शुद्ध नवमी या दरम्यान भागवत सप्ताह साजरा करण्यात आला. पहिल्या दिवशी माहात्म्य कथन, त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून सात दिवस सकाळी संहिता वाचन व दुपारी निरूपण आणि शेवटच्या दिवशी गीता पठण व विष्णुसहस्रनामाचे पठण अशा शास्त्रोक्त पद्धतीने सप्ताह करण्यात आला .

सकाळचे संहिता वाचन वेदमूर्ती श्री. भालचंद्रशास्त्री जोशी यांनी केले तर निरूपण वेदमूर्ती श्री. श्रीकृष्णशास्त्री जोशी यांनी केले. प्रभावी, ओघवत्या व प्रासादिक वाणीतील निरूपण ऐकले म्हणजे शास्त्रीजींचा भागवतावरील अधिकार लक्षात येतो. भागवतातील सर्व विषयांना हात घालत शास्त्रीजी अत्यंत सोप्या भाषेत उदाहरणांचे दाखले देत विषय समजावून सांगतात. शास्त्रीजी गेली अनेक वर्षे भागवत सप्ताहासाठी देवस्थानात येतात पण दरवेळी नवीन नवीन ऐकायला मिळते आणि त्यातील अवीट गोडी लक्षात येते.

**श्री दत्तात्रेय जयंती**

मार्गशीर्ष शुद्ध १४ दिनांक १ डिसेंबर २००९ रोजी देवस्थानात श्री दत्तात्रेय जयंती सोहळा संपन्न झाला. उत्सव साजरे करताना त्याला वैदिक अनुष्ठानाची जोड असावी या शिकवणुकीनुसार श्री दत्तात्रेय जयंती निमित्ताने दिनांक २४ नोव्हेंबर ते १ डिसेंबर पर्यंत 'ऋग्वेद स्वाहाकाराचे' आयोजन केले होते. सहा घनपाठी विद्वानांसह वेदचूडामणी श्री. नवाथे गुरुजींच्या अधिपत्याखाली याग संपन्न झाला. या यज्ञकार्यात वेदान्त विद्यापीठातील काही विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

श्री दत्तात्रेय जयंतीच्या दिवशी पहाटे ४ वाजता भगवान श्री दत्तात्रेयांच्या मूर्तीला १११ लिटर दुधाचा रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर षोडशोपचारे पूजा होऊन आरती झाली. पहाटे ५ ते ६.३० या दरम्यान सभामंडपात देवासमोर भक्तांतर्फे संगीतसेवा सादर करण्यात आली. सकाळी ७ वाजता दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. सकाळी ९ वाजता यागाची पूर्णाहुती झाली. यागाचे यजमानपद विश्वस्त कॅप्टन श्रीकांत धर्माधिकारी यांनी भूषविले.

वैदिक मंत्रांच्या उच्चारणात दुपारी ११.३० वाजता श्री दत्तात्रेयांच्या पूजेस सुरुवात झाली. सनई चौघड्यांच्या मंगल सुरात दुपारी १२ वाजता आरती होऊन 'श्रीदत्तजन्म' साजरा झाला. यानंतर महिला वर्गाने पाळणा म्हटला. त्यानंतर 'दिगंबरा दिगंबरा...' चा जयघोष करण्यात आला. आंध्रातून खास उत्सवासाठी आलेल्या वेदमूर्ती श्री. सुरीजी घनपाठी, वेदमूर्ती श्री. गल्लापल्ली सरमा, वेदमूर्ती श्री. गल्लापल्ली घनपाठी, वेदमूर्ती श्री. सोमयाजलू घनपाठी या कृष्ण यजुर्वेदाच्या चार वैदिक विद्वानांनी यावेळी मंत्रपठण करून श्रीचरणी सेवा रुजू केली. या विशेष वैदिक अतिथींचा परिचय श्री. मोहन शुक्ला यांनी करून दिला.

दुपारी ४ वाजता सर्व सत्संग मंडळांतर्फे प. पू. गुरुदेवांची पाद्यपूजा करण्यात आली. सर्व सत्संग मंडळांचे पदाधिकारी व विश्वस्तांनी गुरुचरणांवर केशर–अत्तर लेपन करून पुष्पहार अर्पण केला. कृष्ण यजुर्वेदाच्या चार विद्वानांचा न्यासातर्फे सत्कार करण्यात आला. घनाच्या मंत्रांचे पठण करून या चारही विद्वानांनी प. पू. गुरुदेवांच्या चरणी सेवा रुजू केली.

आवर्जून उपस्थित राहून सहभाग घ्यावा असा उत्सवाचा भाग म्हणजेच पालखी सोहोळा! यावर्षी तर पालखी सोहोळ्याला एका उंचीवर नेऊन ठेवले ते कृष्ण यजुर्वेद व ऋग्वेद या दोन्ही शाखांतील घनपाठी विद्वानांच्या मंत्रघोषाने. कृष्ण यजुर्वेदाचे वैदिक जेव्हा घनाचे मंत्र म्हणत होते तेव्हा अक्षरश: त्यांची कंपनं जाणवत होती. सायंकाळी ६.३० वाजता आरतीला सुरुवात झाली. आरतीनंतर ठीक ७.३० वाजता भगवान श्री दत्तात्रेय पालखीमध्ये विराजमान झाले आणि 'धन्य धन्य हो प्रदक्षिणा...' म्हणत पालखीस प्रारंभ झाला. पालखीने एकूण तीन प्रदक्षिणा केल्या. पालखीच्या प्रत्येक थांब्याला भक्तिगीतांची सेवा सादर झाली. चारही वेदांची सेवा पालखीमध्ये देवासमोर सादर करण्यात आली. पालखी प्रदक्षिणा चालू असताना शोभेचे दारूकाम व आतषबाजी होत होती. ती पहाताना मन आनंदाने भरून पावत होते. गानसेवा करणाऱ्यांना पालखी सोहळ्यानंतर देवस्थानतर्फे प्रसाद देण्यात आला.

दिनांक २ डिसेंबर २००९ म्हणजे मार्गशीर्ष पौर्णिमा, श्रीदत्तात्रेय जयंतीचा पारण्याचा दिवस. त्या दिवशी सकाळी ९ वाजता भगवान श्रीदत्तात्रेयांच्या समोर शास्त्रचर्चेचा विशेष कार्यक्रम संपन्न झाला. देवस्थानच्या शास्त्रशाखेचे अध्यापक श्री. राजेश्वरशास्त्री घोडस्कर गुरुजी व त्यांच्या सहा विद्यार्थ्यांनी शास्त्रचर्चा केली. संपूर्ण संस्कृतामध्ये झालेला २।। तासांचा कार्यक्रम अतिशय वैशिष्ट्यपूर्ण झाला. दुपारच्या आरतीनंतर भक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतला.